PRATIGYA
Campaign for Gender Equality and Safe Abortion.

# मेडिकल अबॉर्शनसाठीच्या गोळया बाजारपेठांतून नाहिसे होणे; सुरक्षित गर्भपाताच्या दृष्टीने धोकादायक: प्रतिज्ञा मोहिमेच्या पाहणीचा निष्कर्ष

लैंगिक समानता व सुरक्षित गर्भपातासाठी हाती घेण्यात आलेल्या प्रतिज्ञा मोहिमेअंतर्गत भारताच्या चार राज्यांतील बाजारपेठांतील मेडिकल अबॉर्शन (एमए) औषधांच्या उपलब्धतेची पाहणी

**नवी दिल्ली, २९ ऑगस्ट २०१९: वैज्ञकीय गर्भपातासाठीची (मेडिकल अबॉर्शन – MA) औषधे दुकानांमधून वेगाने नाहिशी होत चालल्याचे लैंगिक समानता आणि सुरक्षित गर्भपात या विषयावरील प्रतिज्ञा मोहिमेमधून दिसून आले आहे. 'चार भारतीय राज्यांमध्ये मेडिकल अबॉर्शन औषधांची उपलब्धता' या विषयावरील या पाहणीमधून असे आढळले आहे की, राजस्थान आणि महाराष्ट्रामध्ये मेडिकल अबॉर्शन औषधांची साठवणूक करणे बंद झाले असून या औषधांचा साठा बिहारमध्ये ३७.८% तर उत्तर प्रदेशामध्ये ६६% आहे. या औषधांची साठवणूक न करण्यामागे कायदेशीर/नियमांशी संबंधित अडचणी हे मुख्य कारण असल्याचे ही औषधे आपल्या दुकानात न ठेवणा-यांचे म्हणणे आहे.** मेडिकल अबॉर्शन (एमए) औषधांच्या अनुपलब्धतेमुळे महिलांना सुरक्षित गर्भपाताचे साधन न मिळण्याचा धोका वाढत आहे, विशेषत: जिथे आज भारतातील अंदाजे १० महिलांचा असुरक्षित गर्भपातामुळे (**India due to unsafe abortions**) मृत्यू होतो तिथे गर्भधारणेशी संबंधित मृत्यूंमागे हे तिसरे महत्त्वाचे कारण आहे. या पार्श्वभूमीवर ही बाब अधिकच महत्त्वाची आहे. बिहार, महाराष्ट्र, राजस्थान व उत्तर प्रदेशातील १००८ केमिस्ट दुकानांमध्ये ही पाहणी करण्यात आली.

महिलांच्या आरोग्य व प्रजननाशी संबंधित हक्कांचा पुरस्कार करण्यासाठी वैद्यकीय गर्भपातासाठीच्या (MA) औषधांसह सुरक्षित, परिणामकारक व सहज उपलब्ध असणारी गर्भपाताची सोय ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. भारतामध्ये वैद्यकीय गर्भपात (MA) ही गर्भपाताशी संबंधित देखभालीची सर्वाधिक सुरक्षित मानली जाणारी पद्धत म्हणून पुढे येत आहे व येथे वर्षाकाठी होणा-या १५.६ दशलक्ष गर्भपातांपैकी अंदाजे ८१% (81% of the 15.6 million annual) गर्भपात हे एमए औषधांचा वापर करूनच केले जात आहेत. असे असूनही गर्भपातासाठीची औषधे केमिस्ट्सच्या दुकानांतून नाहिशी होत असल्याचे दिसत आहे.

राजस्थान, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातील या औषधांचा साठा न करणा-या केमिस्टच्या मते नियामक/कायदेशीर अडथळे हे असे करण्यामागचे प्राथमिक कारण आहे, असे या पाहणीतून दिसून आले. याला बिहार राज्य मात्र अपवाद आहे. बिहारमध्ये उत्पादनांना असलेल्या अल्प मागणीमुळे त्यांचा साठा केला जात नसल्याचे दिसून आले आहे. केमिस्टना एमए औषधे न विकण्याचे अनौपचारिक सल्ले दिले गेले आहेत, त्यांना प्रिस्क्रिप्शनच्या प्रती जवळ बाळण्यास सांगितले जात आहे व खास एमए औषधांसाठी नियामक मंडळांचे अधिकारी दुकानांना भेटी देत आहेत असे दिसून आले. एमए औषधांची पाहणी करण्यासाठी अधिका-यांच्या फेरीचे प्रमाण राजस्थानमध्ये १४.३% इतके जास्त होते तर महाराष्ट्रात १७.४% इतके असल्याचे आढळले. **एमए औषधांवर इतर शेड्युल एच औषधांच्या तुलनेत अधिक देखरेख ठेवली जात असल्याचे जवळ-जवळ ५६% केमिस्टनी सांगितले.**

या अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी **प्रतिज्ञा मोहीमेच्या सल्लागार गटाचे सदस्य व फाऊंडेशन फॉर रिप्रोडक्टिव्ह हेल्थ सर्व्हिसेस इंडियाचे प्रमुख कार्यकारी अधिकारी श्री. व्ही.एस चंद्रशेखर** म्हणाले, "सुरक्षित गर्भपाताच्या पद्धती उपलब्ध करून देण्याच्या आघाडीवर भारताने मोठे यश प्राप्त केले आहे. गेल्या दीड दशकामध्ये आरोग्य व कुटुंबकल्याण खात्याने स्वयंप्रेरणेने उचललेल्या पावलांमुळे ही गोष्ट साध्य झाली आहे. एमए औषधे, विशेषत: कॉम्बी पॅक्सच्या उपलब्धतेमुळे

असुरक्षित गर्भपाताचे प्रमाण घटण्यास मदत झाली आहे. एमए औषधे मिळेनाशी झाल्यास मात्र गेल्या काही वर्षात या आघाडीवर आपण मिळविलेले यश फोल ठरू शकते."

केमिस्ट मंडळींची गर्भपात व एमए औषधांबद्दलची जागरुकता, ज्ञान व त्यांचा या औषधांकडे पाहण्याचा दृष्टीकोन जाणून घेण्याचा प्रयत्नही या पाहणीद्वारे करण्यात आला. गर्भपात बेकायदेशीर आहे अशी ४३% केमिस्टची कल्पना असल्याचे दिसले; व गर्भधारणेच्या पहिल्या २० आठवड्यांपर्यंत गर्भपात करण्यास कायद्याची मान्यता आहे ही गोष्ट फक्त २६% केमिस्टना माहीत होती. राजस्थानमध्ये ६०.७% इतक्या मोठ्या प्रमाणात केमिस्टनी सांगितले की, गर्भपात बेकायदेशीर आहे. त्याखालोखाल बिहारमध्ये असे मानणा-या केमिस्टचे प्रमाण ५१.८% आढळून आले. कॉम्बी पॅक एमए औषधांमुळे लिंगनिवडीला मदत होते असे १५% केमिस्टना असे वाटत होते. असे वाटणा-या केमिस्टची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे ४२.५% असल्याचे आढळले." हा समज सर्वथा चुकीची आहे कारण कॉम्बी पॅक्सचा वापर हा गर्भधारणेच्या पहिल्या नऊ महिन्यांतच करता येतो आणि गर्भाचे लिंग माहीत करून घेण्यासाठी सरसरकट वापरल्या जाणा-या व परवडणा-या दरांत उपलब्ध असणा-या अल्ट्रा सोनोग्राफीसारख्या तंत्रज्ञानाद्वारे गर्भाचे लिंग १३-१४व्या आठवड्यामध्येच समजू शकते." प्रतिज्ञा मोहीम सल्लागार गटाच्या सदस्य व फॅमिली प्लानिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या सेक्रेटरी जनरल डॉ. कल्पना आपटे म्हणाल्या. "या गैरसमजूतीमुळे एमए औषधांवर नियमांची जादा बंधने घातली जात आहेत, ज्यामुळे गर्भपाताच्या सुरक्षित, सुलभ व परवडणा-या पद्धतींच्या उपलब्धतेवर लक्षणीय परिणाम होत आहे. त्यातून महिलांचे आरोग्य, स्वास्थ्य आणि प्रजननाचे हक्क यांच्याशी तडजोड केली जात आहे." त्या पुढे म्हणाल्या.

या पाहणीनुसार एमए औषधे विकत घेणा-या महिलांपैकी अगदी थोड्या म्हणजे अवघ्या ९.६% महिला या औषधांमुळे उद्भवलेल्या गुंतागुती सोडवण्यासाठी किंवा संततीनियमनासाठी केमिस्टचा सल्ला घेण्यासाठी माघारी येतात. यातून स्पष्ट होते की, केमिस्टकडून एमए औषधे विकत घेणा-या महिलांपैकी बहुसंख्य महिलांना ही औषधे परिणामकारक वाटतात व ज्यांच्याबाबतीत काही गुंतागुंत उद्भवलीच तर त्या उपचारांसाठी आरोग्यकेंद्रांमध्ये जातात. जे ग्राहक गुंतागुत उद्भवल्यास माघारी येतात त्यांना जवळजवळ सर्वच केमिस्ट डॉक्टरांकडे पाठवतात हे चित्र दिलासा देणारे आहे. बहुतांशवेळा ही औषधे डॉक्टरांच्या प्रीस्क्रीप्शनशिवाय घेतली जातात असाही एक सर्वसाधारण समज असतो, मात्र या पाहणीच्या निष्कर्षांनुसार **५०% ग्राहकांजवळ प्रिस्क्रीप्शन असल्याचे** आढळून आले. "ॲलोपथीच्या डॉक्टरांना एमए औषधे लिहून देण्याची परवानगी मिळाल्यास एमए औषधे घेऊ पाहणा-या महिलांजवळ प्रिस्क्रीप्शन असण्याचे व त्यांना वैद्यकीय पाठबळ मिळण्याचे प्रमाण नक्कीच वाढेल. सध्याच्या नियम व कायद्यांनुसार केवळ प्रसूतीतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ व एमटीपी कायद्यानुसार गर्भपात करण्याची परवानगी असलेले मान्यताप्राप्त ॲलोपेथिक डॉक्टर्स हेच एमए औषधे लिहून देऊ शकतात. त्यानुसार भारतातील जेमतेम ६०-७०,००० डॉक्टर्स तेही प्रामुख्याने शहरी भागांतील डॉक्टर्स एमए औषधे लिहून देण्याचा देण्याचा अधिकार बाळगतात. आपल्यासारख्या महाकाय देशासाठी ही संख्या काळजी वाटावी इतकी अपुरी आहे." व्ही. एस. चंद्रशेखर म्हणाले.

भारतामध्ये वर्षाकाठी होणा-या गर्भपातांची संख्या पाहता केमिस्टनी एमए औषधांचा साठा करणे बंद केल्यास एमए औषधांचा काळाबाजार सुरू होईल. यामुळे या औषधांच्या किंमती वाढतील व महिलांना गर्भपाताची ही सोयीस्कर पद्धत स्वीकारण्यामध्ये आर्थिक अडथळा निर्माण होऊ शकेल.

एमए औषधे ही सुरक्षित आहेत. त्यांचा चुकीच्या पद्धतीने वापर झाला तरीही त्यातून आपत्कालीन परिस्थिती उद्भवण्याची किंवा महिलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नसते. जागतिक आरोग्य संघटनेने अलिकडेच प्रसिद्ध केलेल्या अत्यावश्यक औषधांच्या यादीमध्ये एमए कॉम्बीपॅकचा अंतर्भाव मुख्य यादीमध्ये केला आहे. याआधी ही औषधे पुरक औषधांच्या यादीमध्ये होती. याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे याआधीच्या यादीमध्ये एमए औषधांसाठी विशेष सूचना देणारे asterix (*) हे चिन्ह वापरले गेले होते. त्यात एमए औषधांना काटेकोर वैद्यकीय देखरेखीची गरज असल्याचे सूचित करण्यात आले होते. "आता हे asterix चिन्ह काढून टाकले गेले आहे याचा अर्थ

एमए कॉम्बीपॅक वैद्यकीय देखरेखीशिवायही वापरता येतात व त्यामुळे असलेला धोका नगण्य आहे." डॉ. आपटे पुढे म्हणाल्या.

या अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसून आले आहे की, एमए औषधांची औषध नियामक मंडळांकडून अतिशय काटेकोरपणे तपासणी केली जाते व केमिस्टच्या दुकानाममध्ये ही औषधे उपलब्ध नसणे ही महाराष्ट्र व राजस्थानमध्ये महत्त्वपूर्ण चिंतेची बाब कारण आहे. ही औषधे सहज उपलब्ध व्हावीत यासाठी आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाने व भारताचे ड्रग कंट्रोलर जनरल यांनी सर्व राज्यांतील औषध नियामक मंडळांना एक सूचना/मार्गदर्शनपर पत्रक पाठवावे व त्यात एमए औषधांवर निर्बंध आणून लिंगनिवडीला आळा बसण्यास मदत होत नाही. तसेच एमए औषधे इतर इतर शेड्युल एच औषधांप्रमाणेच प्रमाणित केली जावीत/तपासली जावीत हे स्पष्ट करावे अशी शिफारस प्रतिज्ञा मोहिमेकडून केली जात आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गर्भधारणेच्या कितव्या आठवड्यापर्यंत एमए औषधे घेता येतील याबद्दल एमटीपीचे नियम व डीजीसीआय ने दिलेल्या मुदतींमध्ये तफावत आहे. (नियमांनुसार ही मुदत सात आठवडे आहे तर डीजीसीआयनुसार नऊ आठवडे) यात सुसंगती आणायला हवी. MoHFW/DGCI ने डब्ल्यूएचओच्या नियमावलीबरहुकुम एमए औषधे वापरण्याची मर्यादा गर्भधारणेच्या १२ आठवड्यांपर्यंत वाढवली पाहिजे. ॲलोपेथिक डॉक्टरांना (एक अल्पमुदतीचा ऑनलाइन/प्रत्यक्ष संवादावर आधारित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर) एमए औषधे लिहून देण्याची परवानगी देण्यासाठी एमटीपी कायद्यांत सुधारण केली पाहिजे. असे केल्याने एमए औषधे लिहून देणा-या डॉक्टर्सची संख्या वाढेल व एमएचा वापर करताना महिलांना वैद्यकीय पाठबळ मिळणे शक्य होईल. याशिवाय, किरकोळ औषधविक्रेत्यांनी गर्भपात व एमए औषधांबद्दल योग्य माहिती द्यावी यासाठी त्यांचे या विषयातील ज्ञान वाढविण्यावर सरकारने एमए औषधांच्या मार्केटिंग कंपन्या व केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या साथीने लक्ष केंद्रित करायला हवे.

मोठ्या संख्येने महिलांना असे वाटते की, एमए औषधे परिणामकारक, परवडणा-या किंमतीत उपलब्ध व नको असलेला गर्भ टाळण्यासाठी सोयीचा पर्याय आहे व त्या एमटीपी कायद्याने दिलेल्या परवानगीनुसार या औषधांचा वापर करत आहेत. तपासणीचा मोठा जाच असल्याने एमए औषधे केमिस्टच्या दुकानांतून नाहिशी होत आहेत. असे झाल्यास लक्षावधी महिलांना ही जीवनरक्षक औषधे मिळणार नाहीत आणि परिणामी त्यांना त्यांच्या लैंगिक व प्रजननाशी संबंधित हक्कांशी तडजोड करावी लागेल. गर्भपाताची सुरक्षित सेवा उपलब्ध करून दिल्यास महिलांचा त्यांच्या शरीरावरील व आयुष्यावरील हक्क अबाधित राहील. प्रजनन स्वास्थ्यच्या हक्काची जपणूक करण्याच्या व लिंगसमानतेचा पुरस्कार करण्याच्या दृष्टीने हे अतिशय महत्त्वाचे आहे.

**पाहणीचे तपशीलवार निष्कर्ष पाहण्यासाठी लिंक:** https://bit.ly/2Ht7k3C

**प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वालिटी अँड सेफ अबॉर्शन विषयी:** प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वालिटी अँड सेफ अबॉर्शन हे महिलांच्या हक्कांची जपणूक व पुरस्कार करण्यासाठी तसेच भारतामध्ये त्यांना सुरक्षित गर्भपाताची सुविधा मिळवून देण्यासाठी काम करणा-या व्यक्ती व संस्थांचे नेटवर्क आहे. महिला सक्षमीकरण आणि महिलांसाठी आरोग्यसेवांची उपलब्धता या गोष्टींचा राष्ट्रीय व राज्यस्तरावर सरकार, संस्था व प्रसिद्धीमाध्यमांमध्ये प्रचार व प्रसार करण्याचे काम या मोहिमेद्वारे केले जाते. या कामातील संयुक्त प्रयत्नांसाठी व मोहिमेच्या हेतूच्या पुरस्कारासाठीच्या प्रयत्नांमध्ये धोरणात्मक मार्गदर्शन करण्यासाठी फाऊंडेशन फॉर रिप्रोडक्टिव्ह हेल्थ सर्व्हिसेस इंडियाचे सेक्रेटेरिएट कार्यरत असून याच कामाला समर्पित आठ सदस्यीय मोहीम सल्लागार गट आहे. ही मोहीम पुढीच चार सूत्रांवर लक्ष केंद्रीत करते: अ) गर्भपाताची साधने पुरविणा-यांना पाठबळ देणे, जेणेकरून त्यांनी या सेवा पुरवित रहावे. ब) बाजारपेठेत वैद्यकीय गर्भपातासाठीच्या औषधे सतत उपलब्ध असतील याची काळजी घेणे व एमए औषधांचा स्वत:हून वापर करणा-या महिलांना आधार देणे. क) कायदेशीर तरतुदी समजून घेणे व त्यासंबंधीच्या, विशेषत: गर्भपाताशी संबंधित खटल्यांतील न्यायदानाशी संबंधित घडामोडींचा भाग बनणे. ड) मोहिमेद्वारे एकत्रितपणे उठवला जाणारा आवाज अधिक प्रभावशाली करण्यासाठी संघटना व व्यक्तींशी खंबीर भागीदारी करणे.

अधिक माहितीसाठी www.pratigyacampaign.org  येथे भेट द्या.

**अधिक माहितीसाठी या अभ्यासामध्ये अंतर्भूत केल्या गेलेल्या राज्यांतील लोकांशी प्रतिज्ञा कॅम्पेनचे सेक्रेटरिएट तुमची गाठ घालून देऊ शकेल. अधिक माहितीसाठी कृपया येथे संपर्क साधा:**

**देबांजना चौधरी**
सिनियर मॅनेजर - पार्टनरशीप्स
प्रतिज्ञा कॅम्पेन सेक्रेटरिएट
ईमेल: debanjana.choudhuri@frhsi.org.in
मो.: 8447084563

**कावेरी सिंग**
सिनियर मॅनेजर
एमएसएल इंडिया
ईमेल: kaveri.singh@mslgroup.com
मो.: 9871030182